**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ २० डिसेंबरला
## छत्तीसावा दीक्षांत समारंभानिमित्त विद्यापीठ परिसरात तात्पुरते फोटो स्टुडिओ स्टॉलसाठी अर्ज आमंत्रित

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा छत्तीसावा दीक्षांत समारंभ दि. २० डिसेंबर, २०१९ रोजी विद्यापीठ परिसरात संपन्न होत आहे. या समारंभाच्या निमित्ताने पदवीकांक्षी विद्यार्थ्यांना पदवी ससन्मान प्रदान केली जाते. पदवी मिळाल्यानंतर फोटो काढण्याची विद्यार्थ्यांना सोय व्हावी, यासाठी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने घेतलेल्या निर्णयानुसार विद्यापीठ परिसरातच फोटे स्टुडिओधारकांना पदवीधारकांचे फोटो काढण्यासाठी स्टुडिओ उभारावयाचे असतील, त्यांना नाममात्र १०१/- रूपये शुल्कासह विद्यापीठ परिसरातच विशिष्ट जागा उपलब्ध करून देण्यात येईल, इतर व्यवस्था मात्र संबंधित फोटो स्टुडिओधारकांना करावी लागेल.

ईच्छुक स्टुडिओधारकांनी दि. १० डिसेंबर, २०१९ पर्यंत जनसंपर्क अधिकारी यांचेशी विभागात संपर्क साधून आपले अर्ज सादर करावेत, यानंतर प्राप्त झालेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. दि. १९ डिसेंबर, २०१९ रोजी दु. १.०० वाजता जनसंपर्क विभागामध्ये प्लॉटची ईश्वरचिठ्ठी काढण्यात येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

---

प्रति,

**जनसंपर्क विभाग**
दि. ०४/१२/२०१८.

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी